(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT /Vol. XI / Issue – IV ISSN 2277-8063

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज : एक आधुनिक समाजसुधारक

**श्री. शरद विठ्ठल पाटील** (संशोधक विद्यार्थी), राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रस्तावना**

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात आपल्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक कार्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करून त्यांची सर्वांगीण क्षेत्रात प्रगती घडवून आणणारे प्रजाहितदक्ष सत्ताधीश म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज होय. विचारपूर्वक स्वीकारलेल्या सामाजिक किंवा राजकीय तत्वांच्या बाबतीत कोणतीही तडजोड न स्वीकारता या तत्वांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेले असामान्य मानिसक धैर्य छत्रपती शाहू महाराजाजवळ होते. त्यांच्या कार्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व केवळ कोल्हापूर संस्थानापुरतेच मर्यादित न राहता, अखिल महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातही लोकप्रिय झाले. एक आदर्श राजा, बहूजन समाजाचा नेता म्हणून असलेली त्यांची लोकप्रियता शेवटपर्यंत कायम टिकली. सर्वसामान्य माणसाचे कल्याण करणे हे त्यांनी आपले कर्तव्य मानले व सर्व समाजाला या कर्तव्याच्या अनुरोधाने मार्गदर्शन केले या काळात महाराष्ट्रात उच्च मानल्या गेलेल्या जातीने आपले सर्वांगीण वर्चस्व निर्माण केले होते. व हे वर्चस्व टिकविण्यासाठी बहुजन समाजावर निरनिराळी सामाजिक व धार्मिक बंधने लादलेली होती या बंधनातून बहूजन समाजाचीसुटका करून, त्याला सुशिक्षित बनविण्याचे, जागृत करण्याचे व प्रगत बनविण्याचे कार्य छत्रपती शाहू महाराजांनी केले. त्यांच्या या कार्यामुळेच असामान्य व्यक्तिमत्वाचा, बहुजन समाजाचा लोकनेता म्हणून त्यांना लोकप्रियता मिळाली. आधुनिक काळात महाराष्ट्रात झालेल्या सामाजिक सुधारणांचा इतिहास पाहताना शाहू महाराज हे एक आधुनिक समाजसुधारक होते असे म्हणणे अपरिहार्य ठरते.

छत्रपती शाहू महाराज हे जन्मतः राजघराण्यातील नव्हते. ते कागलच्या घाटगे घराण्यातील होते. त्यांचा जन्म 26 जुलै, 1874 रोजी झाला. त्यांचे जनक पिता श्रीमंत जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे तर मातेचे नाव राधाबाईसाहेब होते. त्यांचे मुळ नाव यशवंतराव होते. सन 1708 मध्ये कोल्हापूरचे स्वतंत्र राज्य स्थापन झाले. त्यानंतर या सत्तेवर छत्रपती दुसरा शिवाजी, छत्रपती संभाजी, ते राजाराम महाराज व छत्रपती चौथे शिवाजी हे सत्ताधीश बनले. पण ते 1883 मध्ये निपुत्रिक अवस्थेतच मृत्यू झाले. कोल्हापूर संस्थानचा कारभार चालविण्यासाठी दत्तक घेण्याची गरज निर्माण झाली. त्यादृष्टीने हालचाली सुरू झाल्या आणि 17 मार्च 1984 रोजी कागलच्या घाटगे घराण्यातील यशवंतराव याला दत्तक घेण्याचे ठरविले. 17 मार्च 1884 रोजी दत्तक विधान झाले.

दत्तक विधानानंतर यशवंतराव हे शाहू महाराज ओळखले गेले. कोल्हापूर घराण्याचे ते वारसदार झाले. शिक्षण पूर्ण झाल्यावर 2 एप्रिल 1994 रोजी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाच्या राज्य कारभाराची सुत्रे आपल्या हाती घेतली त्यांनी प्रजाजनांना जाहिर केले की, "आमचे प्रजानन सदासुखीव संतुष्ट असावेत त्यांच्या हिताची एकसारखी अभिवृत्ती घेत जावी व आमच्या संस्थानचा सर्व बाजूंनी अभ्युदय व्हावा, अशी आमच्या इच्छा आहे" यासाठी सर्वांच्या उज्वल राजनिष्ठेची व सहकार्याची आम्हाला आवश्यकता आहे. या घोषणेवरूनच शाहू महाराजांची आधुनिक समाज सुधारणाची व्यापकता लक्षात येते त्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनातून आणि कार्य पध्दती यातून त्यांच्या कार्याची महती समजून येते. आधुनिक महाराष्ट्राच्या समाज सुधारणेत शाहू महाराजांचे योगदान असामान्य आहे. त्यामुळे त्यांचा उल्लेख आधुनिक समाज सुधारक म्हणूनच करावा येईल.

- **संशोधनाची उद्दिष्टये :**

1. छ. शाहू महाराजांनी केलेल्या शैक्षणिक सुधारणा
2. छ. शाहू महाराजांनी केलेले महिलासाठीचे कायदे
3. आधुनिक समाजसुधारणेतून झालेली समाजाची उन्नती

- **संशोधन पध्दती :**

सदर शोध निबंधाच्या लेखनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

- **संशोधन स्त्रोत :**

सदर शोध निबंधाच्या लेखनासाठी दुय्यम साधन सामुग्रीचा उपयोग करण्यात आला आहे.

- **आशय विश्लेषण :**

छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाचा अधिकार ग्रहण केल्यानंतर स्पष्ट केलेला दृष्टिकोन यातून महाराजांना आपल्या संस्थानात वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या आधारावर शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांनी आधुनिक समाज सुधारक म्हणून जी कार्ये केली आहेत त्यामध्ये प्रामुख्याने शैक्षणिक व महीलांच्यासाठी केलेल्या कार्याचा आढावा या संशोधन पेपरमध्ये घेण्यात आलेला आहे. छ. शाहू महाराजांनी आपल्या कार्यात त्यांनी वास्तववादी, वैज्ञानिक दृष्टीकोन, अनुभववादी दृष्टिकोनाच्या आधारावरच समाजाची उन्नती झाली आहे.

समाजात शिक्षण सर्वासाठी खुले केले तरच समाजाची परिस्थिती बदलेल आणि यातून सर्वांगिण समाजाची उन्नती साधता येईल यावर त्यांचा विश्वास होता.

**1. छ. शाहू महाराजांनी केलेल्या शैक्षणिक सुधारणा :**

जातीसंस्थेच्याद्वारे निर्माण झालेली सामाजिक विषमता दूर करून समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्याच्या हेतूने त्यांनी बहुजन समाजाचे नेतृत्व स्वीकारले. बहुजन समाजाची उन्नती करायची असेल तर त्यांचे शैक्षणिक महत्व ओळखून त्यांच्या कार्यात त्यांनी शैक्षणिक सुधारणेला अतिशय महत्वाचे स्थान दिले. ''शिक्षण हाच आमचा तरणोपाय आहे असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सदी व लढवय्ये वीर कधीच निपजणार नाहीत, म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे.'' अशी छत्रपती शाहू महाराजांची विचारसरणी होती. यावरून त्यांचा शैक्षणिक कार्याचा दृष्टिकोन समजून येतो. समाजाला आधुनिक विचारांशी जोडायचे आणि त्यातून समाजाची प्रगती करायची यासाठी त्यांनी शिक्षणाच्या बाबत खालील सुधारणा आपल्या संस्थानात केल्या.

प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य :

प्राथमिक शिक्षणाचा पाया दृढ केल्यानंतर दृढ करण्याचा त्यांचा निश्चय होता. यासाठी त्यांनी 1913 मध्ये प्रत्येक गावात निदान एक प्राथमिक शाळा असावी अशी इच्छा व्यक्त केली आणि त्यानुसार मंदिरे, चावडी, धर्मशाळा या ठिकाणी शाळा सुरू केल्या व शिक्षकांची पगारावर नेमणूक केली. त्यांनी निरनिराळया शिक्षण संस्था व व्यक्तींना आर्थिक सहकार्य केले त्यामुळे कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षणाचा मोठया प्रमाणावर विकास झाला.

महाराजांनी फक्त शाळा काढल्या आणि ते थांबले नाहीत तर त्यांनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले त्यासाठी 25 जुलै 1917 व 21 नोव्हेंबर 1917 रोजी कायदा केला यातून खेडयातून सक्तीच्या शिक्षण योजनेचा अंमल सुरू झाला. यामुळे शिक्षणाच्या प्रसाराला विस्तृत स्वरूप प्राप्त झाले त्याचा परिणाम असा झाला की 1917–18 साली 27 विद्यार्थ्यांच्या वरून 21–22 मध्ये 22007 विद्यार्थी शिक्षण घेऊ लागले. 1999 मध्ये सर्व जाती धर्मांच्या विद्यार्थ्यासाठी एकच सरकारी शाळा चालू केल्या. यातून त्यांच्या सामाजिक ऐक्याची दूरदृष्टी दिसून येते. बहुजन समाजाला पत, प्रतिष्ठा व स्वतंत्र सामाजिक दर्जा मिळवून देण्याचा महाराजांचा हा आधुनिक समाज सुधारणेचा प्रयत्न आहे असेच म्हणावे लागेल.

स्त्री शिक्षण :

बहुजन समाजाप्रमाणेच स्त्री–जीवनाच्या मागासलेपणाची शाहू महाराजांना जाणीव होती. समाजातील 50 टक्के संख्या ही स्त्रीयांची असते. त्यामुळे समाजाची पूर्ण उन्नती साधायची असल्यास स्त्री शिक्षण महत्वाचे आहे. तसेच 50 टक्के समाज संख्या विकास प्रक्रियेतून बाहेर राहिली तर समाजाचा पूर्ण विकास होणार नाही. यासाठी महाराजांनी स्त्री शिक्षणावर भर दिला. प्राथमिक शिक्षणातील मुलींची फी माफ केली शिक्षणाधिकारी म्हणून श्रीमंत रखमाबाई केळकर यांची नेमणूक केली. स्त्री शिक्षणातून स्त्रीयांचा आणि समाजाचा पूर्ण विकास साधता येतो यावर महाराजांचा विश्वास होता. महाराजांनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण, स्त्री शिक्षणारोबरच उच्च व व्यवसाय शिक्षणाचे महत्व ओळखून 1881 मध्ये राजाराम महाविद्यालय चालू केले. व्यवसाय प्रशिक्षणासाठी जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिटयुट ची स्थापना केली. या विविध शिक्षण संस्थाद्वारे बहूजन समाजाला विविधांगी शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून देण्याचे श्रेय शाहू महाराजांना द्यावे लागेल. यातून त्यांची समाज सुधारणेचा आधुनिक दृष्टिकोन दिसून येतो.

**2. छ. शाहू महाराजांनी केलेले महिलासाठीचे कायदे :**

भारतीय संस्कृती ही कट्टर पुरूषप्रधान संस्कृती राहिली आहे या व्यवस्थेमध्ये स्त्री वर्गास दुय्यम वर्गाची वागणूक दिली गेली होती. वर्णाश्रमातही स्त्री शूद्रच ठरविली गेली होती. शिवाय बालविवाह, पुनर्विवाह, प्रतिबंध, केशवपन, शिक्षणबंदी, कुमारी विवाह यामुळे स्त्रियांचे जीवन असहाय्य बनले होते. समाजाकडून व कुटूंबाकडून स्त्रीयांच्यावर होणारा अन्याय थांबविण्यासाठी त्यांच्या नैसर्गिक हक्कांचे संरक्षण करणाारे अनेक कायदे छ. शाहू महाराजांनी निर्माण केले त्याचा आढावा खालीलप्रमाणे :

- विधवा पुनर्विवाह कायदा जुलै, 1917 मध्ये कोल्हापूर संस्थानात विधवांच्या पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायद्यास मान्यता दिली. 1919 साली कानपूरच्या कृषी परिषदेतसुध्दा महाराजांनी याबाबत आपले मत व्यक्त केले.

- आंतरजातीय विवाह कायदा दि. 12 जुलै 1919 रोजी कोल्हापूर गॅझेटमध्ये प्रसिध्द झाला. या कायद्यान्वये हिंदू व जैन या दोन मुख्य धर्माच्या लोकांना कोणत्याही धर्मामध्ये विवाह करण्याची मुभा देण्यात आली आहे. पुरूष 18 व स्त्री 14 वर्षे पूर्ण असावे असा निर्णय घेण्यात आला. ज्यावेळी ब्रिटीश सरकारने सन 1891 मध्ये धोरणात्मक निर्णय घेऊन (संमती वयाचा कायदा) मंजूर केला तेव्हा विवाहप्रसंगी मुलीचे वय किमान 12 वर्षे असावे असा सांगणारा कायदा केला होता. या सर्व पार्श्वभूमीवर मात्र शाहू महाराज मुलीचे वय हे 14 वर्षे असावे असे म्हणत तर 18 वर्षे पूर्ण झालेल्या मुलीस विवाहासाठी पित्याची अथवा पालकांची संमती आवश्यक नाही असे म्हणतात. यावरून शाहू महाराजांचे समाज सुधारणेचे धोरण किती आधुनिक व पुरोगामी होणे हे लक्षात येते.

- राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात घटस्फोटासंबंधीचा कायदा केला. जात पंचायतीवर आधारित स्त्रीयांच्या बाबतचा कायदा अमान्य करण्यात आला तसेच 1920 मध्ये वारसा हक्काबाबत कायदा केला.

- 17 जानेवारी 1920 मध्ये देवदासी प्रथा प्रतिबंध कायदा करून देवदासी स्त्रीयांना आईबापाच्या मिळकतीतील वारसा हक्क मिळवून दिला त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय विरूध्द कायद्याने बंदी घालण्यात आली.

छ. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात स्त्रीयांच्या बाबत जो विविध कायदे करून स्त्रीयांना समाजात मान सम्मान मिळवून देण्यासाठी जे काम केले ते आधुनिकच म्हणावे लागेल. ज्या समाजात स्त्रीला भोगवस्तू मानले जात होते. त्या समाजात स्त्रीयांच्या सर्वांगिण प्रगतीसाठी महाराजांनी विविध कायदे करून स्त्रीया मान सम्मान मिळवून दिला त्यामुळे ते आधुनिक समाज सुधारक आहेत.

**3. निष्कर्ष :**

छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानाचा कारभार 2 एप्रिल 1894 ला आपल्या हाती घेतली जेव्हा कोल्हापूर संस्थानाची अवस्था दयनीय होती. त्यांना कोणत्याही स्वातंत्र्याचा उपभोग घेता येत नव्हता. त्यांची सामाजिक परिस्थिती हलाखीची होती. त्यांच्यासाठी सर्व बाबतीत काम केले तरच हासमाज मुख्य प्रवाहात येईल आणि यातून आपल्या संस्थानांचा सर्वांगिण विकास साधता येईल. छ. शाहू महाराजांचे कार्ये हे समाजाच्या सर्वांगिण प्रगतीसाठी झाले आहे. या कार्यातून खालील बाबी आधुनिक समाजात झालेल्या पहावयास मिळतात. त्या खालीलप्रमाणे:

**1.** बहूजन समाजाचा शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी प्राथमिक शिक्षणाचा पाया महाराजांनी आपल्या संस्थानांत दृढ केला या शिक्षणाच्या पायावर आज कोल्हापूरची ओळख महाराष्ट्रातील पुरोगामी जिल्हा म्हणून झाली आहे. शिक्षणाच्या कार्यातून महाराजांनी आपल्या संस्थानांचा सर्वांगिण विकास साधला आहे.

**2.** बहून समाजाप्रमाणेच स्त्री–जीवनाच्या मागासलेपणाची शाहू महाराजांना जाणीव होती आणि हा मागासलेपणा दूर करण्यासाठी स्त्रीयांना शिखण दिल्याशिवाय त्यांची उन्नती होणार नाही हे ओळखून महाराजांनी आपल्या संस्थानात स्त्रीयांच्या शिक्षणासाठी योगदान दिले यातून कृष्णबाईंना वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी मुंबईला पाठविण्यात आलेनंतर त्यांनी परदेशात वैद्यकीय शिक्षण घेतले. परदेशात वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या कृष्णाबाई महाराष्ट्रातून दुसऱ्या महिला ठरल्या.

**3.** छ. शाहू महाराजांच्या काळात अनेक संस्थानामध्ये प्राथमिक शिक्षण मिळणे कठीण होते. अशावेळी महाराजांनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षणाबरोबरच उच्च व व्यवसाय शिक्षण सुरू केले यातून महाराजांचा दूर दृष्टीकोन दिसून येतो. आपल्या संस्थानातील समाजाची सर्वांगिण प्रगती होण्यासाठी वेगवेगळया व्यवसाय शिक्षणाची सोय केली लष्करी शिक्षण विद्यार्थ्यांना दिले.

**4.** अस्पृश्यता म्हणजे मानवजातीला लागलेला कलंग असून सामाजिक समतेच्या दृष्टीने तो हानीकारक आहे याची जाणीव महाराजांना होती. अस्पृश्य समाजाची उन्नती करण्यासाठी त्याच्या शिक्षणाची सोय केली तसेच त्यांच्यासाठी 1907 साली कोल्हापूर येथे अस्पृश्य मुलांसाठी मिस क्लार्क वसतिगृह सुरू केले. 1919 च्या हुकूमानुसार अस्पृश्यकता मानायची नाही असे आदेश काढले. महाराजांनी आपल्या कृतीतून अस्पृश्यता निर्मुलन केले. अस्पृश्य जातीतील विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करून शिक्षणाची संधी दिली. अस्पृश्य जातीतील लोकांची आपल्या राज्यकारभारात नेमणूक केली तसेच नागपूर, दिल्ली येथे भरलेल्या अस्पृश्यांच्या परिषदांचे अध्यक्षपद स्वीकारले.

**5.** आर्थिक विकासासाठी शेती, उद्योगधंदे, व्यापार व सहकार या क्षेत्रांत नवीन उपाययोजना केल्या. 1918 मध्ये कुलकर्णी वतने रद्द केली. 1908 मध्ये शेतीला बारमाही पाणी मिळण्याच्या दृष्टीने 'महाराणी लक्ष्मीबाई तलाव' बांधण्याची योजना आखली. आणि छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात धरणाचे काम पूर्ण झाले. आज कोल्हापूर जिल्हयात जी हरित क्रांती झाली आहे त्याचे श्रेय महाराजांना जाते. या धरणाच्या पाण्यातून 32,000 एकर जमिन ओलीता खाली आली आहे.

**6.** महाराजांनी आपल्या संस्थानात 1885–86 मध्ये स्थापन झालेल्या प्रातिनिधिक लोकसभेच्या काही मागण्या मान्य केल्या असून महाराजांचा आधुनिक दृष्टिकोन यातून दिसून येतो. महिलांच्यासाठी काही कायदे केले. एकंदरीत महाराजांनी आपल्या संस्थांच्या सर्वांगिण प्रगतीसाठी काम केले आहे. आज कोल्हापूरच्या शेती, शिक्षण, उद्योग, व्यापार, सामाजिक, राजकीय क्षेत्रात जी प्रगती झाली आहे. त्याचे श्रेय महाराजांनाच द्यावे लागेल. या कार्यातून छ. शाहू महाराज हे एक आधुनिक समाज सुधारक होते असे म्हणणे अपरिहार्य ठरते.

**संदर्भसूची :**

1. प्रा. पाटील, एन. डी., प्रा. थोरात डी.एस., प्रा. डॉ. पवार विश्वनाथ, प्रा. चिंदे एम. डी., भारतातील समाज सुधारणेचा इतिहास फडके प्रकाशन, कोल्हापूर.
2. डॉ. पवार जयसिंगराव – छत्रपती शाहू स्मृतिदर्शन प्रथमावृत्ती, कोल्हापूर.
3. कोरे धनंजय – राजर्षी शाहू छत्रपती
4. डॉ. पवार जयसिंगराव – शाहू गौरव ग्रंथ प्रकाशन महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी